# नियमित दिवाणी दावा क्रमांक ५४१/२०२४ मधील नि.क्र.४१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांना प्रस्तुत कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेसाठी दिला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द मिळकती संबंधाने करण्यात आलेले खरेदीखते हे कायद्याने बेकायदेशीर आहेत असे घोषित होऊन मिळण्यासाठी केला आहे. प्रतिवादी क्र. ९ म्हणजेच मा. उपअधीक्षक भूमी अभिलेख ह्यांना समाविष्ट केले आहे. परंतु, ते सरकारी नोकर असल्याने त्यांचे दायित्व हे मा. जिल्हाधिकारी यांचेकडे येते. प्रतिवादी क्र. ९ च्या कार्यालयीन कृती ह्या सरकारी धोरणांचा भाग म्हणूनच वाचला जातो. अशा परिस्थितीत सरकारच्या वतीने सरकारी बाजू मांडण्याची मा. जिल्हाधिकारी हयांना दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार अधिकार आहेत. सबब, मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांना प्रतिवादी क्र. १० म्हणून समाविष्ट करण्यात यावे अशी विनंती केली आहे. तसेच दावा दाखल करताना नियोजित प्रतिवादीला मूळ दाव्यात दावा दाखल करताना समाविष्ट करण्यात आले नाही, त्यामुळे वादीस कलम ८० (२) नुसार देण्यात येणा-या नोटीसपासून सवलत मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादी यांनी हरकत नोंदविली. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीने केलेली मागणी मुलतः बेकायदेशीर आहे. कायद्यातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, सातारा यांना दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० नुसार नोटीस देणे गरजेचे आहे. वादीने कायद्यातील तरतुदीचे पालन न करता दावा दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १० म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांना प्रतिवादी म्हणून सामील करण्यासाठी दुरुस्ती अर्ज दिला आहे, तो कायद्याच्या तरतुदीच्याविरुध्द आहे. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने मागणी केल्यानुसार दुरुस्ती होऊन पक्षकार सामिल करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा दिनांक ०३.१०.१९८९ रोजीचे व दिनांक ०४.१०.२००७ रोजीची खरेदीखते बंधनकारक नसल्याचे मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. वादी अर्जामध्ये नमूद पक्षकार यांना प्रतिवादी क्र. १० म्हणून सामील पक्षकार करण्याची मागणी वादी दुरुस्तीने मागत आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादीने मागणी केलेली दुरुस्ती मंजुर करणे योग्य व कायदेशीर आहे. वादीने नमुद केलेली कथने शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच वादीस कलम ८० (२) नुसार देण्यात येणा-या नोटीसपासून सवलतही देण्यात येते. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

### <u>आ दे श</u>

१. अर्ज नि. ४१ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीने योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

४. वादीस कलम ८० (२) नुसार देण्यात येणा-या नोटीसपासून सवलत देण्यात येते.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.04 17:50:43 +0530

**( व्ही. बी. घाडगे )**

दिनांकः- ०३.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.